HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सहकार तपस्वी माजी आमदार ब्रम्हदेव दादा माने राजकीय व सामाजिक कार्य: एक अभ्यास

डॉ.प्रकाश संभाजी जमदाडे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग ,
दहिवडी कॉलेज दहिवडी ता.माण,जि. सातारा .



## बालपण व शिक्षण

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये महाराष्ट्राची जडणघडण होत असताना अनेक लोकांनी आपापल्या जिल्ह्यामध्ये तालुक्यामध्ये प्रकाश वाट शोधत जनतेला योग्य मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच पुरोगामी आधुनिक विचारसरणी लाभलेला महाराष्ट्र निर्माण झाला. अशाच पैकी एक व्यक्तिमत्व कै. ब्रम्हदेव दादा माने हे होय. ब्रम्हदेव माने यांचा जन्म आई सुभद्राबाई आणि वडील कृष्णात माने यांच्या पोटी दिनांक १५ फेब्रुवारी १९२९ रोजी झाला.[१] ब्रम्हदेव दादा माने यांचे कुटुंब शेती व्यवसाय करणारे होते. मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण ब्रम्हदेव माने यांनी पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला. स्वतःला समाज कार्यासाठी वाहून घेतले. यातूनच त्यांचे व्यक्तिमत्व घडले. पुढील काळामध्ये त्यांनी उत्तर सोलापूर तालुका व सोलापूर जिल्ह्याच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण असे योगदान दिले.

## राजकीय कारकीर्द-

ब्रम्हदेव माने यांचे वडील कृष्णात माने हे रेल्वेमध्ये गँग मुकादम म्हणून नोकरी करीत होते. त्याकाळी रेल्वेमध्ये बरीच युरोपियन मंडळी सुद्धा त्यांच्यासोबत काम करीत असत. युरोपियन मंडळींनी भारतीय नेत्यांची केलेली चुकीची टिप्पणी कृष्णात माने यांना सहन होत नसे. परिणामी त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला व कुमठे गावी किराणा दुकानाची सुरुवात केली. किराणा दुकानाच्या माध्यमातून गरजूंना किराणा दुकानातील साहित्य पुरविणे, रात्री अपरात्री इतरांना मदत करणे हे कार्य सुरू केले. आपल्या वडीलांकडून राष्ट्रभक्ती व स्वाभिमान, गरजूंना मदत करणे, समाजाप्रती जाणीव असणे हे गुण ब्रम्हदेव माने यांनी आपल्या अंगी बानवले होते. सन १९५२ ते सन १९६७ जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाची धोरणे राबविली. त्यातून ग्रामीण भागातील नेते पुढे आले.

स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती झाली. सोलापूर जिल्ह्यामध्ये ब्रम्हदेव माने सारखे नेतृत्व उद्यास आले. ब्रम्हदेव माने अवघ्या २२ व्या वर्षी कुमठे गावाचे सरपंच झाले. त्यांनी जवळपास १७ वर्ष सरपंच पदावर काम केले. ग्रामपंचायतीमध्ये काम करत असताना नळ पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम, बौद्धिक प्रबोधनपर व्याख्यान, ग्रामपंचायतीची सुसज्ज इमारत बांधकाम यासारखी कामे त्यांनी केली. आदर्श गाव म्हणून कुमठे गावाचा केलेला कायापलट महाराष्ट्र राज्यासमोर उदाहरण म्हणून ओळखला जाऊ लागला. सन १९६६-६७ दरम्यान उत्तर सोलापूर तालुका पंचायत समितीचे सभापती म्हणून त्यांनी काम केले. सन १९६७ साली विधानसभा निवडणूक लागली. या निवडणुकीवेळी ब्रम्हदेव माने यांनी राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता असताना काँग्रेस उमेदवाराच्या विरोधात अपक्ष निवडणूक उत्तर सोलापूर तालुक्यामधून लढविली. निवडणुकीमध्ये प्रबळ काँग्रेस उमेदवाराचा पराभव करून उत्तर सोलापूर तालुक्यातून विजय मिळविला. त्यांचा या निवडणुकीतील विजय हा ऐतिहासिक ठरला. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये याविषयी त्या काळामध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. सन १९६७ ते सन १९७२ या काळात विधानसभेचा सदस्य म्हणून उत्तर सोलापूर तालुक्याचे प्रतिनिधित्व केले. तालुक्याच्या विकासाकडे लक्ष दिले. उत्तर सोलापूर तालुक्याच्या रस्ते सुधारण्याच्या कामास त्यांनी गती दिली. याबरोबरच दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळी, अक्कलकोट तालुक्यातील हंजगी, चुंगी, कुरनूर इत्यादी गावांचा विकास घडवून आणण्यासाठी रस्ते, विहिरी, शाळा यासारखी विकास कामे केली. सन १९६५ ते सन १९७९ या काळामध्ये १४ वर्ष सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून काम पहिले. पीक कर्जा व्यतिरिक्त शेतकऱ्यांना शेतीतील इतर कामासाठी कर्ज मिळाले पाहिजे, शेतकऱ्यांना दुग्धोत्पादन व्यवसाय करण्यासाठी बँकेने कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे अशा प्रकारचे मुद्दे बँकेच्या बैठकांमध्ये ब्रम्हदेव माने यांनी मांडले व मंजूर करून घेतले. सन १९७२ ते सन १९७९ या कालावधीमध्ये त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक म्हणून ७ वर्षे काम केले. सन १९७७ ते सन १९८९ या दरम्यान ब्रम्हदेव माने सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष होते. सदर कालावधीमध्ये काँग्रेस पक्षाला सोलापूर जिल्ह्यामध्ये बळकटी आणण्याचे काम केले. सन १९८५ मध्ये सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधान परिषदेचे सदस्य झाले.[२]

## शैक्षणिक कार्य

ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षण थांबू नये मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी या उद्देशाने ब्रम्हदेव दादा माने यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कुमठे गावामध्ये शिक्षण प्रसारक मंडळ कुमठे ही संस्था सन १९६७ मध्ये स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून बालवाडी पासून ते कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत शिक्षण दिले जाते. याबरोबरच त्यांनी तांत्रिक शिक्षणाची गरज ओळखून पॉलिटेकनिक कॉलेजची स्थापना केली. आपल्या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गरीब, दिनदलितांसाठी शिक्षणाची दारे उघडली. नोकरीच्या मागे न लागता तरुणांनी स्वतःचे उद्योग निर्माण करावे ही त्यांची तळमळ होती.

मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी देखील त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले. मुस्लिम समाजातील थोर व्यक्तिमत्व तत्कालीन प्राचार्य श्री. वडवान यांनी मुस्लिम समाजाची शैक्षणिक दुरावस्था ब्रम्हदेव (दादा) माने यांना सांगितली. यावेळी त्यांनी वडवान यांना मदत केली. यातूनच सोलापूर सोशल असोसिएशन ही शैक्षणिक संस्था सोलापूरमध्ये उभा राहिली. मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक विकासामध्ये या संस्थेने खूप मोठे योगदान दिले आहे. या दरम्यानच मुस्लिम समाजातील लोकांना आर्थिक बळ मिळावे म्हणून सोशल अर्बन बँक स्थापन करण्यासाठी मदत केली.[३]

## सहकार क्षेत्रातील कार्य

वसंत दादा पाटील व शंकरराव मोहिते पाटील हे नेते त्यांचे राजकीय क्षेत्रातील आदर्श होत. या थोर नेत्यांचा आदर्श सहकार क्षेत्राच्या बाबतीत ब्रम्हदेव दादा माने यांनी घेतला. जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य असताना त्यांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज व दक्षिण सोलापूर तालुक्यातील कर्देहळळी येथे सहकारी सोसायटीची स्थापना केली. यांना आदर्श सोसायटी म्हणून बक्षीस मिळाले. या पाठीमागे ब्रम्हदेव दादा माने यांची कृती प्रवणता आणि दुरदृष्टी दिसून येते. सन १९६९ साली ब्रम्हदेव दादा माने उत्तर सोलापूर तालुक्याच्या खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष होते. यावेळी तालुक्यातील शेतकरी वर्गासाठी उपयुक्त ठरणारे अभिनव असे प्रयोग त्यांनी राबविले. यामध्ये शेतीमालासाठी गोदाम बांधणे, शेतकऱ्यांच्या दारापर्यंत कृषीविषयक सेवा पुरविणे. संघाच्या माध्यमातून मशिनरी विभाग त्यांनी सुरू केला. यामध्ये शेतकऱ्यांना अल्प दरामध्ये बी बियाणे, खते, अवजारे उपलब्ध करून दिली.[४] शेतकऱ्यांना सधन बनविण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यांनी केलेले दिसून येते.

## कामगारांसाठी केलेले कार्य

महाराष्ट्रामध्ये भाई छनुसिंह चंदेले यांना कामगार चळवळीचे प्रणेते म्हणून ओळखले जात होते. भाई छनुसिंह चंदेले हे ब्रम्हदेव दादा माने यांचे प्रेरणा स्थान होते. यांच्यामुळेच ते कामगार चळवळीकडे आकर्षित झाले. त्यांनी कामगारांच्या अडीअडचणी समजून घेणे, मालक आणि कामगारांमध्ये प्रेमाचे आणि सहकार्याचे वातावरण निर्माण होणे जरुरीचे आहे असे ते मानत. दोघांमध्ये बंधू भावाचे आणि विश्वासाचे नाते निर्माण झाल्याशिवाय कामगार आणि मालकांची आर्थिक, सामाजिक प्रगती होऊ शकणार नाही. तसेच राष्ट्राची प्रगती होणार नाही यावर त्यांचा विश्वास होता. सन १९५७ मध्ये शिवाजी वर्क्स लिमिटेड कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांनी संप केला.[५] त्यामुळे अनेकांना कामावरून काढून टाकले गेले. यावेळी ब्रह्मदेव दादा माने यांनी मध्यस्थी करून कामगारांना पुन्हा कामावर घेण्यास भाग पाडले. हे अत्यंत महत्त्वाचे काम कामगार चळवळीच्या माध्यमातून त्यांनी केले.

सोलापूरमध्ये मोठ्या प्रमाणात गिरण्या असल्यामुळे कामगारांची संख्या जास्त होती. परंतु कामगारांची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय असल्यामुळे कामगार हा सावकारांच्या पाशामध्ये अडकत असे. हे ब्रम्हदेव दादांनी स्वतः पाहिले होते. कामगारांना मदत व्हावी या उद्देशाने त्यांनी सोलापूर येथे यशवंत सहकारी कामगार बँकेची

स्थापना केली. बँकेच्या माध्यमातून कामगारांनी कर्ज घेऊन आपल्या पत्नींना छोटे छोटे घरगुती व्यवसाय सुरू करून द्यावेत. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारेल हा उद्देश बँकेच्या स्थापनेमागचा ब्रह्मदेव दादा माने यांचा होता. सन १९६५ मध्ये सोलापूर येथील टिकेकर टेक्सटाईल कारखाना डबघाईस आलेला असताना हा कारखाना सोलापूरातून हलविण्याचे प्रयत्न सुरू झाले. यावेळी ब्रम्हदेव दादा माने यांनी कामगारांना एकत्रित करून कामगारांचे शेअर्स स्वरूपात पैसे जमवून हा कारखाना ताब्यात घेतला. कामगारांच्या मालकीचा सहकारी तत्त्वावर चालविला जाणारा हा महाराष्ट्रातील पहिला कारखाना होता. कामगारांचे संघटन करणे, त्यांच्याकडून पैसे जमा करून त्यांच्याच मालकीचा कारखाना उभा करणे यासाठी ब्रम्हदेव दादा माने यांनी घेतलेले परिश्रम खूप महत्त्वपूर्ण आहेत. जवळजवळ २५ वर्ष ते कारखान्याचे चेअरमन होते. पुढील काळात खादी ग्रामोद्योग संघाचे चेअरमन म्हणून काम करीत असताना निरनिराळया गावांमध्ये अंबरचरखा केंद्र त्यांनी सुरू केले. ज्या ज्या सहकारी संस्थांमध्ये त्यांनी काम पाहिले त्या त्या संस्थांना मोठ्या करून लोकाभिमुख बनविण्याचे काम केले. त्यांनी यशवंत सहकारी कुक्कुटपालन संस्था, विवेकानंद नागरी सहकारी पतपेढी बाळे इत्यादी संस्था निर्माण करून त्या नावारूपाला आणण्याचे काम केले.[६] श्री. सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निर्मितीमध्ये देखील ब्रम्हदेव दादा माने यांचा सिंहाचा वाटा आहे. या कारखान्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे. कारखान्याच्या संचालक पदाच्या निवडणुका बिनविरोध करण्यामागे त्यांचे मोठे योगदान असल्याचे दिसून येते.

## सामाजिक कार्य

संजय गांधी निराधार योजना, संजय गांधी स्वावलंबन योजना यासारख्या समित्यांवर त्यांनी काम केले. अशा समित्यांवर काम करत असताना लोककल्याणाला त्यांनी प्राधान्य दिले. सन १९७२ सालच्या दुष्काळाच्या कालखंडामध्ये शेतकऱ्यांचे प्रचंड हाल झाले. या काळामध्ये त्यांनी सरकारकडून अनेक योजना मंजूर करून घेतल्या. शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा पाण्याची व्यवस्था याबरोबरच शेतकऱ्यांच्या शहरात शिक्षणासाठी राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या खाण्याची सोय व निवासाची सोय व्हावी या उद्देशाने जवाहर नेहरू वसतिगृहाची स्थापना सोलापूरात केली.

अशा प्रकारे लोककल्याणाचा ध्यास घेऊन तालुक्यातील सर्व सामान्य गरीब कुटुंबातील लोकांची कामे करून तालुक्याच्या विकासाला हातभार लावण्याचे महत्वपूर्ण कार्य ब्रम्हदेव दादा माने यांनी केल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ

१. चव्हाण चंद्रकांत संदीपान, उपरोक्त, पृ. क्र. ४०१, ४०२.
२. तपस्वी, आमदार ब्रह्मदेवजी माने गौरवग्रंथ,१५ फेब्रुवारी, १९९१, पृ. क्र. ४०.
३. कित्ता, पृ. क्र. १७२.
४.चव्हाण चंद्रकांत संदीपान, उपरोक्त, पृ.क्र.४०९.
५. कित्ता, पृ. क्र. ४११.
६. मुलाखत, घोडके पाटील शिवाजी, खाजगी सचिव ब्रह्मदेव दादा माने,दि. २२/०७/२०२३.